नॅक 'अ' दर्जा

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

परिपत्रक क्र. नियोजन व सांख्यिकी/III/ 01 /२०२२

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील व उपपरिसर उस्मानाबाद येथील सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील शैक्षणिक विभाग यांचा इतर संस्था, मंडळे, औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या इ. सोबत करावयाच्या सामंजस्य करार करणे संदर्भात दि.०४/१२/२०२२ रोजीच्या आयोजित अधिष्ठाता मंडळाने खालील प्रमाणे ठराव पारित केला आहे.

"विद्यापीठाचे इतर शैक्षणिक संस्था, मंडळे औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या इ. सोबत सामंजस्य करार करण्यासाठी अधिष्ठाता मंडळासमोर प्रस्ताव सादर करण्यापूर्वी प्रथम संबंधित विभागांनी विद्यापीठाच्या विधी अधिकारी यांच्याकडून तपासून व त्यावर त्यांचा अभिप्राय घ्यावा. विधी अधिकारी यांनी काही बदल सुचविल्यास त्याप्रमाणे बदल करून सामंजस्य कराराचा मसुदा तयार करून प्रस्ताव नियोजन व सांख्यिकी विभागाकडे अधिष्ठाता मंडळासमोर ठेवणे विषयी सादर करावा. तद्नंतर नियोजन व सांख्यिकी विभाग सदर सामंजस्य कराराबाबत विधी अधिकारी यांच्याकडून संबंधित विभागांनी तपासणीकरून अभिप्राय घेतला आहे, यांची खात्री/पडताळणी करून अधिष्ठाता मंडळासमोर विचारार्थ प्रस्ताव सादर करेल."

करिता उपरोक्त प्रमाणे नमूद केल्यानुसार सामंजस्य कराराविषयी कार्यवाही करून तद्नंतर सामंजस्य कराराचा प्रस्ताव नियोजन व सांख्यिकी विभागास सादर करण्यात यावा.

सर्व विभाग प्रमुख शैक्षणिक विभाग यांनी सदर परिपत्रक विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

विद्यापीठ प्रांगण, *
औरंगाबाद. *
संदर्भ क्र.: नि.सां/२०२१-२२/1549 *
दिनांक : ०७/०१/२०२२ *

Rsuryawanshi
कुलसचिव

या पत्राची एक प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव:

१) सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , औरंगाबाद.
२) मा.संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, उस्मानाबाद.
३) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
४) प्रभारी विधी अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.